नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३७/२०२०

निशाण क्रमांक ७७ / क

वादी तर्फे साक्षीदार क्रमांक २

| | | |
|---|---|---|
| नाव | - | डॉ. मल्लीकार्जुन विरुपाक्ष अथणी |
| वय वर्षे | - | ६४ वर्षे |
| व्यवसाय | - | सेवा निवृत्त - वैदयकिय अधिकारी |
| राहणार | - | डॉक्टर कॉलनी, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर |

वादी तर्फे वकील आर. आर. चव्हाण यांचे मार्फत सरतपास सुरु

१. मला या प्रकरणात साक्ष देण्याकरीता साक्षी समन्स मिळाले. मी सन १९९३ ते २०२२ पर्यंत आरोग्य विभाग, पंचायत समिती, गडहिंग्लज येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सन २०१० साली माझी पंचायत समिती, गडहिंग्लज येथेच नेमणूक होती. गट विकास अधिकारी यांनी मला मुतारीच्या दुर्गंधी बाबत आरोग्य विषयक अहवाल देण्याकरीता आदेशीत केले होते. त्याप्रमाणे मी प्रत्यक्ष जागी जावून भेट दिली. मी शाळेच्या बाजूला असलेल्या मुतारीला भेट दिली. मला सध्या शाळेचे नाव आठवत नाही. सदरील शाळा ही चार ते पाच खोल्याची होती. समोर एक खेळाचे मैदान होते. रस्त्याच्या बाजूला मुतारी होती. मुतारीच्या बाजूला कुणाची घरे होती का हे मला आढळून आले नाही. सर्व प्रथम मुतारीची पाहणी केली. त्यानंतर ज्या व्यक्तीने तक्रार केली होती त्यांचे घर किती लांब आहे हे टेप लावून त्याचे मोजमाप केले. सदरील मोजमाप हे मुतारीच्या आऊटलेट पासून तक्रारदाराच्या घराच्या हुंब-यापर्यंत मोजले. मुतारी ही स्वच्छ होती तसेच आऊटलेट हे सिलंड असल्याचे आम्हाला आढळून आले. मुतारी मुळे आरोग्याला बांधा उत्पन्न होते अशी त्याची तक्रार होती तसे मला पाहणीत आढळून आले नाही. पाहणी झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल गटविकास अधिकारी यांना सादर केला. तो अहवाल मला दाखविल्यास तो मी ओळखू शकतो. मला आता अहवाल दाखविण्यात आला तो अहवाल मीच सादर केलेला आहे. त्यावर तालुका अधिकारी म्हणून माझी स्वाक्षरी आहे. सदरील अहवालातील मजकूर बरोबर आहे.

सदरील अहवालाची मुळ प्रत पंचायत समितीला सादर करण्यात आली आहे. सदरील अहवालास निशाणी क्रमांक ७८ देण्यात येते.

सरतपासपूर्ण.

प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे वकील एम. व्ही. पाटील यांचे मार्फत उलट तपास सुरु

२. प्राथमिक आरोग्य केंद्र, हलकर्णी हे माइया माहितीचे आहे. ते नांगनूर पासून साधारणता २० कि.मी. अंतरावर आहे. जानेवारी २०१८ मध्ये तेथे कोण वैदयकीय अधिकारी कार्यरत होते याबद्दल मला माहिती नाही. पंचायत समितीने मला पत्र दिले होते पण त्याची तारीख मला आठवत नाही. असे म्हणता येणार नाही की, सदरील पत्राच्या आधारे निशाणी क्रमांक ७८ वरील अहवाल मी दिला आहे. अहवाल हा दिनांक ३१/३/२०१० रोजीचा आहे. दिनांक १८/०३/२०१० रोजीचे पत्र कार्यालयात उपलब्ध होऊ शकते का या बद्दल मी काही सांगू शकत नाही. १८/३/२०१० रोजीच्या पत्राचे मी वाचन केले होते. हे मला आठवत नाही की, सदरील पत्रामध्ये गट नंबर ४३४ मधील संडास व मुतारी याची पाहणी करावी याचा उल्लेख केला होता. मला प्राप्त झालेले साक्षी समन्सचे मी वाचन केले होते. साक्षी समन्स मध्ये कशासंदर्भात साक्षी समन्स आहे याचा उल्लेख नाही. ज्या अहवाला बाबत मला साक्ष दयायची आहे त्या अहवाला बाबत पंचायत समितीने दिलेल्या पत्राची पाहणी करण्यास मला अडचण होती. सेवानिवृत्ती नंतर न्यायालयात साक्ष देण्याकरीता माहिती घेण्यासाठी कार्यालयात जावून त्या विषयी माहिती घेण्यास शासनाव्दारे प्रतिबंधीत करण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक १८/३/२०१० रोजी पाहणी करण्याकरीता गेलो हे केवळ मी निशाण क्रमांक ७८ वरील दस्ताचे वाचून केल्यामुळे सांगतो. दिनांक १८/३/२०१० रोजीच्या पत्राचे वाचन मी ज्यावेळेस पत्र आले त्यावेळेस मी केले होते. ते पत्र मी न्यायालयात हजर करु शकत नाही. पत्र प्राप्त झाल्यानंतर किती दिवसानंतर पाहणीस गेलो हे मला आज आठवत नाही. नांगनूर गावी मुतारीच्या पाहणी करीता गट विकास अधिकारी यांनी मला पाठविले होते. मला प्राप्त झालेल्या

पत्रामध्ये मुतारीचे निश्चीत स्थान नमूद केलेले नव्हते. पाहणीच्या वेळेस सदरील ग्रामपंचायतीच्या संरपचाला, सदस्याला नोटीस दयावी असे मला वाटले नाही. निशाणी क्रमांक ७८ वरील पत्रामध्ये मी या तारखेला, या वेळी घटनास्थळी गेलो होतो याचा उल्लेख केलेला नाही. मी घटनास्थळी किती वाजता गेलो हे मला आज आठवत नाही. निशाणी क्रमांक ७८ वरील पत्रामध्ये राम हायस्कूल, नांगनूर याचा उल्लेख करण्यास मला कोणीही सांगीतले नाही. राम हायस्कूल येथे आमच्या कार्यालयातील सब सेंटरचा स्टाफ याच्या सांगण्याप्रमाणे मी तेथे गेलो. घटनास्थळी गेल्यानंतर तेथे घटनास्थळाचा मी पंचनामा केला नाही. साक्षीदार स्वताहून सांगतो की, त्याचे मी फोटो काढलेले आहेत. गट विकास अधिकारी यांनी दिलेल्या पत्रामध्ये घटनास्थळाचे फोटो काढून अहवाल दाखल करण्यास सांगीतले नव्हते. गट विकास अधिकारी यांनी पत्रामध्ये तक्रारदार याच्या नावाचा उल्लेख केला होता हे मला आज आठवत नाही. तक्रारदाराचे हे घर आहे याची माहिती मोजदाद करताना मला शाळेने दिली. हे म्हणणे बरोबर आहे की, मी सरळ श्री राम हायस्कूल, नांगनूर येथे गेलो. हे म्हणणे बरोबर आहे की, श्री राम हायस्कूल च्या कर्मचारी यांनी मला मुतारी दाखविली. हे म्हणणे खरे नाही की, सदरील कर्मचारी यांनी आम्हाला सदरील मुतारीचा उपयोग विदयार्थी व विदयार्थीनी हे प्राप्त विधीसाठी करतात हे मला सांगीतले. मी पाहणी केली तेथे किती मुतारी व किती संडास आढळून आले हे मला आज आठवत नाही. मुतारी ही सिंगल होती का डब्बल होती हे मला आठवत नाही. त्याचे प्रवेशव्दार कुठल्या दिशेने होते हे मला आज आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पाहीलेली मुतारी ही श्री राम हायस्कूल, नांगनूर याला लागून होती. मुतारीची मोजदाद मी केली नाही. मी अंदाजे देखील सदरील मुतारीची लांबी - रुंदी सांगू शकत नाही. गट नंबर ४३४ मध्ये मुतारी आहे याबद्दलची माहिती मला कोणी दिली नाही. संकेश्वर - नांगनूर हा रस्ता पूर्व पश्चिम बाजूने जातो. अहवाल देण्यापूर्वी मी रामचंद्र मोकाशी यांना ओळखत नव्हतो. मुतारीच्या उत्तर बाजूस रामचंद्र मोकाशी यांचे घर आढळून आले. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, मुतारी पासून रामचंद्र मोकाशी यांचे घर ५० फुट अंतरावर आहे. हलकर्णी येथील आरोग्य केंद्र हे जिल्हा परिषद

अंर्तगत येते. त्या आरोग्य केंद्रावर देखील आरोग्य अधिकारी कार्यरत असतात. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ७८ वरील अहवाल देण्याकरीता गट विकास अधिकारी यांनी मला कुठलेही पत्र दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, श्री राम महाविदयालयाचे संचालक माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ७८ वरील अहवाल मी कुठलेही पत्र प्राप्त न होता स्वइच्छेने दिलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, शासनाचे परिपत्रक, आदेश, पत्र व्यवहार, गट विकास अधिकारी यांचा पत्र व्यवहार ३० वर्षापर्यंत जतन करुन ठेवले जातात. मला आता नकाशा दाखविण्यात आला सदरील नकाशा व मी भेट दिलेले स्थळ यामध्ये फरक जाणवतो. (साक्षीदारास निशाणी क्रमांक ६२ सोबतचा कोर्ट कमिशनर यांनी दाखल केलेला नकाशा दाखविण्यात आला होता.)

प्रतिवादी क्रमांक २, ५ व ६ तर्फे वकील एस. बी. चोथे यांचे मार्फत उलट तपास सुरु

प्रतिवादी क्रमांक २,५ व ६ यांनी प्रतिवादी क्रमांक ७ चा उलट तपास स्वीकारला.

प्रतिवादी क्रमांक १, ३ व ४ पुकारता गैरहजर तर्फे वकील पुकारता गैरहजर. सबब त्यांचे विरुध्द उलट तपास नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक ०४/०९/२०२५

सही/-

( न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज